Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग घेताना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास

*संशोधक*
श्री. भाऊसाहेब मधुकर पगारे
आणि
*मार्गदर्शक*
प्रा. डॉ. दादासाहेब मोरे
*एम ए, एम एड ,सेट, पीएचडी*
*संशोधन स्थळ*
*मातोश्री आसराबाई दराडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय बाभुळगाव, ता.येवला*

*संशोधन सारांश*

*शाळा ही समाजाची एक छोटी प्रतिकृती आहे शाळेचे मध्ये विविध प्रकारच्या शालेय समित्या असतात त्यापैकीच एक महत्त्वाची समिती म्हणजे स्थानिक शाळा व्यवस्थापन समिती होय प्रस्तुत संशोधन अभ्यासातून संशोधकांनी स्थानिक शाळा व्यवस्थापन सहभाग घेताना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास करून उपाय योजना सुचविल्या आहेत सदर संशोधनाची उद्दिष्टे ही प्राथमिक शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीच्या शैक्षणिक विकासातील योगदान अभ्यासणे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सचिव मुख्याध्यापक यांच्या कर्तव्यांचा आढावा घेणे शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या शैक्षणिक विषयक कार्याचा आढावा घेणे शाळा व्यवस्थापन समितीच्या शैक्षणिक विषयक शिफारशी व उपाययोजना सुचविणे. सदर संशोधन उद्दिष्टानुसार माहिती मिळवण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पद्धती द्वारे प्रश्नावली या साधनाचा वापर केला होता संशोधकांनी समिती अध्यक्ष सचिव मुख्याध्यापक तसेच समिती सदस्य यांच्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरून माहिती गोळा केली तसेच पालकांसाठी मुलाखतीद्वारे माहितीचे संकलन केलेले आहे सदर संशोधनासाठी माहिती मिळवत असताना निफाड तालुक्यातील खेडले झुंगे केंद्रांतर्गत येणाऱ्या 10- प्राथमिक शाळांमधील 12 शिक्षक तसेच 12 मुख्याध्यापक आणि 12 पालक या न्यादर्शाकडून माहितीचे संकलन केले. प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान आणि प्रमाण विचलन या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर संशोधकांनी केलेला आहे सदर संशोधन अभ्यासातून संशोधकाला असे निष्कर्ष आढळले की प्राथमिक शाळांमध्ये शालेय व्यवस्थापन विषयक सर्व विभाग पूर्णता एकत्रित एकाच रजिस्टर मध्ये ठेवलेले आढळून आले नाही तसेच शासकीय माहिती पाठविण्यासाठी विहित नमुने देखील उपलब्ध नाहीत शिक्षकांना अध्यापनाच्या वेळेस रेकॉर्ड नोंदणीचे काम करावे लागते. शैक्षणिक उपक्रमांमध्ये नवागतांचे आगमन स्वागत शैक्षणिक शिबिर नियोजन सहशाले उपक्रम वृक्षारोपण क्रीडा स्पर्धा याविषयी पुरेशी माहिती आढळून आलेली नाही शैक्षणिक उठाव जमा खर्च देखील सुव्यवस्थित आढळले नाही या सगळ्या मागे शिक्षक आणि*

***मुख्याध्यापक यांच्यावर असणारा शैक्षणिक आणि अशैक्षणिक कामकाजाचा बोजा हे प्रमुख कारण आढळून आले. शाला माहिती प्रपत्रके अचूक भरण्यासाठी शिक्षण अधिकाऱ्यांचे शैक्षणिक शिबिर राबविण्यात यावी तसेच शाला व्यवस्थापन समितीच्या कार्याची गुणात्मक आणि भावात्मक दर्जा तपासणीसाठी निरीक्षण सूचित द्वारे मूल्यमापन करण्यात यावी शालेय व्यवस्थापन माहितीचे संगणकीकरण करणे ही काळाची गरज आहे त्या दृष्टीने पावले उचलण्यात यावी अशा प्रकारच्या शिफारशी संशोधकांनी सदर संशोधन समस्येवर सुचविल्या आहेत.***

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्त्वाचे शब्द -** शाळा व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद शाळा

**1. पार्श्वभूमी -**

अन्न वस्त्र निवारा याबरोबरच शिक्षण हे देखील मानवाचे मूलभूत गरज आहे समाज विकास व प्रगतीसाठी शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. देशाची प्रत्येक नागरिकाचे जडणघडण ही शालेय शिक्षणातूनच होते शालेय शिक्षणात प्राथमिक स्तरावरील शिक्षण मानवी विकासाचा पाया मानला जातो देशातील प्राथमिक शिक्षण जेवढे दर्जेदार होईल तेवढी पुढील स्तरावरील शिक्षणात फलश्रुती मिळण्यास मदत होते. प्राथमिक शिक्षणातील गुणवत्ता वाढीसाठी केंद्र व राज्य सरकार वेगवेगळया मार्गाने प्रयत्न करतात .

ग्रामशिक्षण समिती व वार्षिक शिक्षण समिती यांचे रचना व नावात बदल करून या दोन्ही समित्या शाळा व्यवस्थापन समिती म्हणून ओळखल्या जातात प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता विकासामध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते संशोधक सध्या जि प प्राथमीक शाळा निकम वस्ती धारणगाववीर तालुका निफाड जिल्हा नाशिक या शाळेत कार्यरत आहेत त्या निमित्ताने संशोधकाची इतर प्राथमिक शिक्षकांची वेगवेगळ्या शैक्षणिक विषयांवर चर्चा होते सद्यस्थितीतील शाळा व्यवस्थापन समिती बाबत प्राथमिक शिक्षकांशी संशोधकाची जेव्हा चर्चा होते तेव्हा या समितीच्या कार्याबाबत अनेक खेदजनक बाबी समोर आल्या आहेत आणि या समितीचे सहभाग घेताना बऱ्याच समस्या येत असल्याचे जाणवले या समस्याचे मूळ कारणे शोधून त्याचे मूळ असे जाणे आणि त्यातून पुढे आलेले निष्कर्ष अभ्यासून संबंधित संस्था व यंत्रणा यांना शिफारशी व उपायोजना करण्याचे संशोधकाने ठरवले आहेत म्हणून संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आला होता.

**2. संशोधनाची गरज -**

प्राथमिक शाळा विविध विकासाच्या टप्प्यावर शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे . शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्यांमधील समन्वय निर्माण करून काम करणे हे आवश्यक असते तसेच पालकांना देखील समितीच्या कार्याविषयी माहिती असणे गरजेचे आहे शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य करत असताना कोणत्या अडचणी येतात हे समजून घेणे हे संशोधकाला त्याच्या दैनंदिन जीवनामध्ये अध्यापनाच्या कार्यामध्ये आवश्यक वाटले आणि त्याच पार्श्वभूमीवर सदर संशोधनाची गरज जाणवली होती.

**3. संशोधन महत्व**

सदर संशोधन अभ्यासामुळे शिक्षकांना आपल्या दैनंदिन अध्यापनातून वेळ काढून शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य वेळेवर कसे पूर्ण करावे हे समजण्यास मदत झाली आहे तसेच पालकांना देखील शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्यप्रणाली विषयी माहिती मिळण्यास निश्चितच मदत झाली आहे प्राथमिक शाळांना देखील भौतिक सोयी सुविधा आणि शैक्षणिक विकास यांचा परस्पर संबंध शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्यातून कसा घडवावा ते समजण्यास मदत झाली आहे अशा प्रकारे सदर संशोधन हे निश्चितच उपकारक ठरले आहे.

**4. संशोधन शीर्षक - स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग घेताना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास**

**समस्या विधान - खेडलेझुंगे केंद्रांतर्गत येणाऱ्या प्राथमिक शाळातील स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग घेताना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास करून उपाययोजना सुचविणे.**

**5. व्याप्ती –**

सदर संशोधनाच्या क्षेत्र व्याप्तीमध्ये नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात असणाऱ्या खेडले झुंगे केंद्रातील खेडले झुंगे कारवाडी बोरमाथा कोळगाव माचारी ब्राह्मणवाडी करंजी सारोळे थडी धारणगाव वीर धारणगाव खडक निकम वस्ती व शेख वस्ती या बारा प्राथमिक शाळांचे समावेश होतो शालेय व्यवस्थापनातील विविध क्षेत्रांपैकी संशोधनाची व्याप्ती स्थानिक शाळा व्यवस्थापन समिती पुरतीच मर्यादित होते.

**मर्यादा**

सदर संशोधना स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग घेताना येणाऱ्या अडचणी समितीच्या कार्यात अध्यक्ष सचिव मुख्याध्यापक यांची भूमिका या घटकांपर्यंत मर्यादित होते.

6. **संशोधन उद्दिष्टे**

1. प्राथमिक शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीच्या शैक्षणिक विकासातील योगदान अभ्यासणे
2. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सचिव मुख्याध्यापक यांच्या कर्तव्यांचा आढावा घेणे.
3. शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या शैक्षणिक विषयक कार्याचा आढावा घेणे
4. शाळा व्यवस्थापन समितीच्या शैक्षणिक विकास विषयक शिफारशी व उपायोजना सुचविणे

**7. संशोधनाची कार्यपद्धती**

प्रस्तुत संशोधनातून प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग घेताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करायचा असल्याने संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला होता.

**8. नमुना निवड किंवा संशोधन जनसंख्या आणि न्यादर्शन—**

**जनसंख्या –**

संशोधनकार्यासाठी नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील असणाऱ्या खेडले झुंगे केंद्रांतर्गत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिव मुख्याध्यापक शिक्षक व पालक यांची उपलब्ध संख्या ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या होती. नाशिक जिल्ह्यातील सर्व जि प प्राथमीक शाळा मधील व्यवस्थापन समिती

सदस्यांसाठी होती.

**न्यादर्श** - खेडले झुंगे केंद्रांतर्गत दहा शाळांमधील 12 शिक्षक तसेच 12 मुख्याध्यापक आणि बारा पालक असा संशोधनाचा न्यादर्श होता.

सदर संशोधनासाठी संशोधकाने सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर केला होता.

9. माहिती संकलनाची साधने

सदर संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला होता प्रश्नावली चे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

1. **समिती अध्यक्ष प्रश्नावली** ---10 प्रश्न
2. **समिती सचिव मुख्याध्यापक प्रश्नावली** ---10 प्रश्न
3. **समिती सदस्य प्रश्नावली**--- 10 प्रश्न
4. **पालक मुलाखत** ----10 प्रश्न

संशोधकाने सदर घटकांकडून स्वतः माहितीची संकलन केले आहे आणि त्या आधारे निष्कर्ष काढले आहेत.

**10. सामग्री विश्लेषणाची पद्धती**

प्रस्तुत संशोधनातून प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी **मध्यमान आणि शेकडेवारी** या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात आला होता.

**11 निष्कर्ष**

**1. समिती अध्यक्ष प्रश्नावली नुसार प्राप्त निष्कर्ष**

समिती अध्यक्षांच्या मते पालकांचे सदर कार्यासाठी पुरेशी योगदान आवश्यक त्या प्रमाणात लाभत नाही कारण पालकांना असणारी त्यांच्या जबाबदाऱ्या कामे यामुळे पालक सदर सभांना वेळेवर उपस्थित राहू शकत नाही त्यामुळे विकासाच्या दृष्टीने मर्यादा पडतात. शैक्षणिक उठाव जमा खर्च देखील सुव्यवस्थित आढळले नाही

**2. समिती सचिव मुख्याध्यापक प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त निष्कर्ष**

मुख्याध्यापकांच्या मते शिक्षकांवर असणारा अशैक्षणिक कामकाजाचा बोजा तसेच ऑनलाइन माहिती भरताना येणारा अडचणी आणि शालेय व्यवस्थापन समितीच्या कार्याविषयी उदासीनता या प्रमुख समस्या दिसून येतात. प्राथमिक शाळांमध्ये शालेय व्यवस्थापन विषयक सर्व विभाग पूर्णता एकत्रित एकाच रजिस्टर मध्ये ठेवलेले आढळून आले नाही तसेच शासकीय माहिती पाठविण्यासाठी विहित नमुने देखील उपलब्ध नाहीत

**3. समिती सदस्य प्रश्नावली नुसार प्राप्त निष्कर्ष**

समिती सदस्यांच्या मते शाला व्यवस्थापन समिती कार्य करत असताना सदस्यांना पुरेशा प्रमाणामध्ये अधिकार आणि कर्तव्य प्रदान केली जात नाही तसेच त्यांच्या कार्यावर शंका उपस्थित केली जाते.

**4. पालक मुलाखतीतून प्राप्त निष्कर्ष**

पालकांना शाला व्यवस्थापन समितीच्या असा सहविचार सर्वांसाठी वेळ नसतो. तसेच या कार्याचे स्वरूप समजून घेण्यात अडचणी येतात. पालकांना शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्याचे गांभीर्य व महत्त्व लक्षात येत नाही.

**12. शिफारशी**

1. शाला माहिती प्रपत्रके अचूक भरण्यासाठी शिक्षण अधिकाऱ्यांचे शैक्षणिक शिबिर राबविण्यात यावी.
2. शाला व्यवस्थापन समितीच्या कार्याची गुणात्मक आणि भावात्मक दर्जा तपासणीसाठी निरीक्षण सूचितद्वारे मूल्यमापन करण्यात यावी.
3. शालेय व्यवस्थापन माहितीचे संगणकीकरण करणे ही काळाची गरज आहे त्या दृष्टीने पावले उचलण्यात यावी.
4. सहविचार सभाचे नियोजन करताना सर्वांची उपलब्धी या घटकाचा विचार करण्यात
5. पालकांना शालेय व्यवस्थापन समितीचे महत्त्व समजून सांगण्यासाठी विशेष वर्गाचे नियोजन करण्यात यावे.
6. शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा विचारात घेता त्यांना वेळेच्या उपलब्धी बाबत विचार करण्यात यावा
7. ऑनलाइन माहिती भरताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शाळांनी प्रयत्नशील असावे
8. शिक्षकांना शाला व्यवस्थापन समितीचे रजिस्टर कसे मेंटेन करावे याविषयी माहिती गटशिक्षण अधिकाऱ्यांकडून देण्यात यावी.

अशाप्रकारे सदर संशोधन अहवाल सारांश दिसून येतो

**संदर्भसूची**

1. बापट ,भा.गो .(१९७५). शैक्षणिक संशोधन. पुणे: नूतन प्रकाशन
2. भिंताडे वि.रा. (1994) शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे: नूतन प्रकाशन
3. मुळे रा.श.आणि उमाठे, वि.तू. (1977) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे .नागपूर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ